# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## व्यवस्थापन परिषदेच्या छत्तीसाव्या सभेचा कार्यवृत्तांत
## शुक्रवार, दि.३० सप्टेंबर, २०११ दुपारी १:०० वा.

**व्यवस्थापन परिषदेची छत्तीसावी सभा शुक्रवार, दि.३०/०९/२०११ रोजी दुपारी १:०० वा.** व्यवस्थापन परिषद कक्षात मा. कुलगुरू महोदय यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

सभेस खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १) | मा. प्रा. डॉ. बंडगर बी. पी. - कुलगुरु | अध्यक्ष |
| २) | डॉ. लोणीकर एस. व्ही. | सदस्य |
| ३) | प्राचार्य डॉ. शेंडगे आर. एन., संचालक म. व वि. वि. मंडळ | सदस्य |
| ४) | प्राचार्य श्री. पवार एस. के. | सदस्य |
| ५) | प्राचार्य डॉ. गणगे के. एन. | सदस्य |
| ६) | डॉ. सूर्यवंशी एस. एस. | सदस्य |
| ७) | डॉ. शिळीमकर टी. एन. | सदस्य |
| ८) | डॉ. श्रीमती याजमान्य एस. आर. | सदस्या |
| ९) | ॲड. श्री. सलगर बी. एस. | सदस्य |
| १०) | डॉ. कदम एस. डी. | सदस्य |
| ११) | प्राचार्य डॉ. भांजे बी. एम. | सदस्य |
| १२) | डॉ. शेख ए. ए. | सदस्य |
| १३) | श्री. गायकवाड बी. आर. | सदस्य |
| १४) | डॉ. साळुंखे डी. जे., परीक्षा नियंत्रक | कायम निमंत्रित |
| १५) | डॉ. पुजारी डी. डी., वित्त व लेखा अधिकारी | कायम निमंत्रित |
| १६) | कॅप्टन डॉ. सोनजे एन. पी., कुलसचिव | सचिव |

**अनुपस्थिती :**

डॉ. सूर्यवंशी ए. बी. व डॉ. बी. बी. कदम यांनी दूरध्वनीद्वारे या सभेस अनुपस्थित रहाणार असल्याचे कळविले. त्याची नोंद घेण्यात आली.

**स्वागतः**

कुलसचिवांनी सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत केले.

सदर सभेत खालील प्रमाणे कामकाज झाले.

[ १ ] दि.२१ जुलै, २०११ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.

ठराव : दि.२१ जुलै, २०११ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेचा कार्यवृत्तांत खालील दुरुस्तीसह वाचून कायम करण्यात आला व कार्यवाही अहवालामध्ये खालील दुरुस्तीस नोंद घेण्यात आली.

१) ठराव क्र. २९(३) नुसारच्या कार्यवाहीमध्ये, "------" ऐवजी "सदरचा प्रस्ताव मा.कुलगुरुंनी अस्वीकार केला" अशी दुरुस्ती करावी.

**[ २ ] महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८ (x) नुसार व्यवस्थापन परिषदेस मा.कुलगुरु यांनी सादर करावयाचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर.**

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८ (x) नुसार मा.कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर करणे आवश्यक आहे. त्यानुसार मा.कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर.

**ठराव : महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८ (x) नुसार मा.कुलगुरुमहोदयांनी सादर केलेल्या अहवालाची नोंद घेण्यात आली.**

**[ ०३ ] विद्यापीठाच्या ४८२ एकर (ज्ञानतिर्थ नगर) परिसरात "परीक्षा भवन व मुख्य प्रशासकीय इमारत" बांधणे या कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजुरी देण्याबाबत बांधकाम समितीने केलेली शिफारस विचारार्थ.**

(टिपणी: दि. १३/०९/२०११ रोजीच्या बांधकाम समितीच्या सभेमध्ये खालीलप्रमाणे विषय क्र. २ ठेवला होता.

विषय क्र. २ विद्यापीठाच्या ४८२ एकर (ज्ञानतिर्थ नगर) परिसरात " **परीक्षा भवन व मुख्य प्रशासकीय इमारत** " बांधणे या कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजुरी देण्याची बाब विचारार्थ

टिपणी: विद्यापीठाच्या ४८२ एकर (ज्ञानतिर्थ नगर) परिसरात परीक्षा भवन व मुख्य प्रशासकीय इमारत बांधणे या कामासाठी विद्यापीठाच्या वास्तुविशारद पॅनेलमधील वास्तुविशारद मे. डिझाईन ग्रुप, मुंबई यांना सदर कामाचे अंदाजपत्रक, नकाशे, इत्यादी काम करणेबाबत कार्यालयीन पत्र क्र. SUS / Engg.Section / 2010-11 / 8707 दि.११/०१/२०११ नुसार कळविण्यात आले होते.

मे. डिझाईन ग्रुप, मुंबई यांनी दि.२६/८/२०११ रोजी G +3 इमारतीचे [210000 Sq.ft Built up Area] नकाशे व ₹१५,५२,६७,०५३/-चे अंदाजपत्रक व अनुशंगिक खर्चाचे विवरण सादर केले आहे. सबब मे. डिझाईन ग्रुप, मुंबई यांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकीय व अनुशंगिक खर्चाची एकूण रक्कम ₹२२.७२ कोटी व अनुषंगिक खर्चास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब विचारार्थ

**ठराव क्र. २: विद्यापीठाच्या ४८२ एकर (ज्ञानतिर्थ नगर) परिसरात "परीक्षा भवन व मुख्य प्रशासकीय इमारत" बांधणे या कामास खालीलप्रमाणे प्रशासकीय मान्यता देण्याची शिफारस करण्यात आली.**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1 | Estimated cost | : | ₹ | 15,52,67,053/- |
| 2 | Royalty Charges | : | ₹ | 12,82,660/- |
| 3 | Insurance charges (1%) | : | ₹ | 15,52,670/- |
| 4 | Electrical Charges (12%) | : | ₹ | 1,94,08,381/- |
| 5 | External Service (5%) | : | ₹ | 77,63,352/- |
| 6 | Development works (5%) | : | ₹ | 77,63,352/- |
| 7 | Contingencies charges (5%) | : | ₹ | 96,51,873/- |
| 8 | Work charged establishment (2%) | : | ₹ | 38,60,749/- |
| 9 | PWD DSR variation for the year 2011-12 @ (10%) | : | ₹ | 2, 06,55,009 |
| 10 | Total amount | : | ₹ | 22,72,05,099/- |

वरील एकूण रक्कम ₹२२.७२ कोटी (रु.बावीस कोटी बाहत्तर लाख फक्त) रक्कमेच्या प्रशासकीय मान्यतेची शिफारस व्यवस्थापन परिषदेस करण्यात आली.

सबब, बांधकाम समितीने शिफारस केलेली एकूण रक्कम ₹२२.७२ (अक्षरी बावीस कोटी बहात्तर लाख फक्त) ची प्रशासकीय मान्यतेची बाब विचारार्थ).

**ठराव : विद्यापीठाच्या ४८२ एकर (ज्ञानतिर्थ नगर) परिसरात "परीक्षा भवन व मुख्य प्रशासकीय इमारत" बांधणे या कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजुरी देण्याबाबत बांधकाम समितीने केलेली शिफारस स्विकारुन ₹२२.७२ कोटी यास प्रशासकीय मान्यता देवून सदरचे काम विद्यापीठामार्फत करण्यास मान्यता देण्यात आली.**

**[ ०४ ] शैक्षणिक वर्ष २०१२-१३ साठी सत्रारंभ व सत्र समाप्तीच्या तारखा व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी : विद्यापीठ संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठातील शैक्षणिक संकुले यांच्या करीता शै.वर्ष २०१२-१३ साठी सत्र आरंभ व सत्र समाप्तीच्या तारखा निश्चित करण्यासाठी दि.२०/०७/२०११ रोजी मा.अधिष्ठाता, सर्व विद्याशाखा व मा.संचालक, सर्व शैक्षणिक संकुले यांची बैठक मा.संचालक, मविविमं व मा.परीक्षा नियंत्रक यांच्या उपस्थितीत संपन्न झाली.

सदर बैठकीत खालील प्रमाणे सत्रारंभ व सत्र समाप्तीच्या तारखा निश्चित करुन सत्र आरंभ व सत्र समाप्तीच्या तारखा विद्या परिषदेस शिफारस करण्यात आल्या.

दि.०९/०९/२०११ रोजीच्या विद्या परिषदेच्या बैठकीत सदर तारखा विचारार्थ सादर केल्या असता विद्या परिषदेने ठराव क्रं ६७ अन्वये सदर तारखा स्विकारुन व्यवस्थापन परिषदेस शिफारस केलेल्या आहेत.

| **विद्याशाखा** | **प्रथम सत्र** | | **द्वितीय सत्र** | |
|---|---|---|---|---|
| | **प्रारंभ** | **समाप्ती** | **प्रारंभ** | **समाप्ती** |
| कला, वाणिज्य, विज्ञान, सामाजिक शास्त्रे, विधी, (पदवी व पदव्युत्तर संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठातील शैक्षणिक संकुले ) | **१३ जून २०१२** | **२७ आक्टोंबर २०१२** | **२४ नोव्हेंबर २०१२** | **३० एप्रिल २०१३** |
| आभियांत्रिकी, तांत्रिक, आर्किटेक्चर, फार्मसी, व्यवस्थापन अभ्यासक्रम एम.बी.ए., एम. एस. डब्ल्यू इ. (पदवी व पदव्युत्तर संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठातील शैक्षणिक संकुले ) | **०२ जुलै २०१२** | **३० नोव्हेंबर २०१२** | **०१ जानेवारी २०१३** | **२३ मे २०१३** |
| शिक्षणशास्त्र, (बी.एड.बी.पीएड., एम.एड.,एम.पीएड., एम.ए एज्युकेशन इ.पदवी व पदव्युत्तर संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठातील शैक्षणिक संकुले ) | **०२ जुलै २०१२** | **२५ नोव्हेंबर २०१२** | **२६ डिसेंबर २०१२** | **२२ मे २०१३** |

**टीप:सत्रारंभ व सत्रसमाप्तीच्या तारखांमध्ये महाविद्यालयास बदल करता येणार नाही.**

सत्रारंभाच्या दिवशी महाविद्यालयाची साप्ताहिक सुट्टी किंवा सार्वजनिक सुट्टी येत असल्यास त्याच्या दुस-या दिवशी सत्रारंभास सुरूवात करावी. सत्र समाप्तीच्या दिवशी महाविद्यालयाची साप्ताहिक सुट्टी किंवा सार्वजनिक सुट्टी येत असल्यास त्याच्या अगोदरचा दिवस सत्र समाप्तीचा दिवस राहील.

सबब शै.वर्ष २०१२-१३ च्या सत्र आरंभ व सत्र समाप्तीच्या तारखा विचारार्थ).

ठराव : **शैक्षणिक वर्ष २०१२-१३ साठी सत्रारंभ व सत्र समाप्तीच्या तारखांबाबत विद्यापरिषदेची शिफारस स्विकारुन मान्यता देण्यात आली.**

**[ ०५ ] प्रिं.के.पी.मंगळवेढेकर इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट करीअर डेव्हलपमेंट ॲन्ड रिसर्च, सोलापूर या महाविद्यालयाने विद्यापीठाच्या परवानगीशिवाय विद्यार्थ्यांकडून अतिरिक्त रक्कम आकारल्याबाबत महाविद्यालयावर कारवाई करण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी : उपरोक्त महाविद्यालयाकडून बीबीए, बीसीए या अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांकडून विद्यापीठाने निर्धारीत केलेल्या शुल्का व्यतिरीक्त `२५०० /- इमारत विकास निधीकरीता घेतलेली असल्याची तक्रार श्री.अश्विन पाथरुडकर, शहर उपाध्यक्ष, महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांच्याकडून प्राप्त झालेली होती. उपरोक्त तक्रारीच्या अनुषंगाने महाविद्यालयास खुलासा सादर करण्याबाबत पत्राव्दारे कळविण्यात आले होते. ( पत्र क्रं सोविसो / बीसीयुडी / ॲफि / ७५७९ दि. ०७/१२/२०१०)

पत्रास अनुसरुन महाविद्यालयाने पत्र क्रं केपीएम / २९२ दि.१३/१२/२०१० अन्वये खुलासा सादर केलेला होता. तथापि सादर केलेला खुलासा हा समाधानकारक नसल्यामुळे पुनःश्च महाविद्यालयाने सादर केलेल्या पत्रातील मुददयांच्या अनुषंगाने खुलासा सादर करण्याबाबत पत्राव्दारे ( पत्र क्रं सोविसो / बीसीयुडी / ॲफि / १०४८९ दि. ०३/०३/२०११ ) व स्मरण पत्र क्रं (सोविसो / बीसीयुडी / ॲफि / १३७० दि. ३०/०५/२०११ ) कळविण्यात आले होते.

महाविद्यालयाकडून पत्र क्रं केपीएम / ८८ दि.०७/०६/२०११ अन्वये खुलासा प्राप्त झालेला होता सदर पत्रातील खुलासा हा उपरोक्त पत्रास ( पत्र क्रं केपीएम / २९२ दि.१३/१२/२०१०) समांतर असल्याने त्यास अनुसरुन महाविद्यालयाकडून बीबीए, बीसीए या अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांकडून विद्यापीठाने निर्धारीत केलेल्या शुल्का व्यतिरीक्त `२५०० /- घेतलेली रक्कम (शुल्क) कशासाठी घेतलेली आहे याचा अर्थबोध होत नव्हता. उपरोक्त सर्व बाबीं विचारात घेता महाविद्यालय जाणूनबुजून याबाबत योग्य व सविस्तर खुलासा सादर करण्यास टाळाटाळ करीत असल्याचे निदर्शनास येत होते.

त्यास्तव महाविद्यालयाने विद्यार्थ्यांकडून बीसीए व बीबीए अभ्यासक्रमास विद्यापीठाने निर्धारीत केलेल्या शुल्का व्यतिरीक्त `२५०० /- आकारलेले शुल्क कोणत्या कारणासाठी आकारली आहे याची पडताळणी करण्यास्तव मा.प्राचार्य एस.के.पवार व मा.प्राचार्य गोसावी एस.एन यांची व्दि-सदस्यीय चौकशी समिती नियुक्त करण्यात आली होती.

सदर समिती सदस्यांनी महाविद्यालयास उपरोक्तकामी भेट देऊन सोबत जोडल्याप्रमाणे अहवाल या कार्यालयाकडे सादर केलेला आहे. व अहवालात शुल्का संदर्भात खालील बाबी निदर्शनास आल्याने विद्यापीठाच्या मान्यतेशिवाय व अभ्यासक्रमाशिवाय घेतलेल्या कोर्ससाठी व आकारलेल्या फि बाबत विद्यापीठ नियमानुसार योग्य ती कारवाई महाविद्यालयावर करण्याची शिफारस केलेली आहे.

**समिती सदस्यांना निदर्शनास आलेल्या बाबी**

**१. महाविद्यालयाने विद्यापीठाच्या परवानगी शिवाय विद्यार्थ्यांकडून रक्कम जमा केलेली आहे.**

**२. साधारणतः सन २००९-१० व २०१०-११ एकूण रक्कम `१०,३५,९७०/-इतकी आहे.**

**३. घेतलेली रक्कम महाविद्यालयाच्या खात्यावर जमा केलेली आहे.**

४. महाविद्यालयाने १ ते ४ मुद्यामध्ये नमूद केलेल्या सोयी व कोर्सची सुविधा दिलेली आहे पण त्याची विद्यापीठाकडून मान्यता घेतलेली नाही.

तसेच सदर समिती सदस्यांनी सादर केलेल्या अहवालात प्रस्तुत महाविद्यालयाचे स्थानिक व्यवस्थापन सचिव यांनी विद्यापीठाच्या पूर्व परवानगीशिवाय शै.वर्ष २००९-१० मध्ये `१००० /- व २०१०-११ मध्ये `२५०० /- असे शुल्क संस्थेने विद्यार्थ्यांकडून ऐच्छिक स्वरुपात आकारले असल्याचे व सदर शुल्कास विद्यापीठाकडून परवानगी घेण्याचे नजर चुकीने राहून गेल्याचे कळविले आहे.

उपरोक्त सर्व बाबी अवलोकनी घेता महाविद्यालयाकडून महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ८१ (१) (h) चे उल्लंघन झालेले आहे.

प्रि.के.पी.मंगळवेढेकर इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट करीअर डेव्हलपमेंट ॲन्ड रिसर्च, सोलापूर या महाविद्यालयाने विद्यापीठाच्या परवानगीशिवाय विद्यार्थ्यांकडून शै.वर्ष २००९-१० व २०१०-११ मध्ये अतिरिक्त रक्कम आकारल्याबाबत महाविद्यालयावर कारवाई करण्याची बाब विचारार्थ).

ठराव : प्रिं.के.पी.मंगळवेढेकर इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट करीअर डेव्हलपमेंट ॲन्ड रिसर्च, सोलापूर या महाविद्यालयाने विद्यापीठाच्या परवानगीशिवाय विद्यार्थ्यांकडून अतिरिक्त रक्कम आकारल्याबात खालीलप्रमाणे कारवाई करण्यात यावी असे ठरले.

१) सदर महाविद्यालयाने विद्यार्थ्यांकडून घेतलेली अतिरिक्त रक्कम संबंधितास परत करावी. यासाठी विद्यापीठाने महाविद्यालयास मुदत द्यावी.

२) सदर महाविद्यालयाने विद्यार्थ्यांकडून घेतलेल्या अतिरिक्त रकमेच्या १०% रक्कम दंड म्हणून विद्यापीठाकडे भरावा.

३) प्राचार्य एस. के. पवार व प्राचार्य एस. एन. गोसावी या पूर्वीच्याच समितीने सदर कार्यवाहीवर देखरेख ठेवून लवकरात लवकर अहवाल विद्यापीठास सादर करावा.

**[ ०६ ] व्यवसायाभिमुख अभ्यासक्रमांची (करिअर ओरीएंटेड कोर्सेस) परीक्षा घेण्यासाठी विद्यापीठाकडे भरणा करावयाच्या शुल्कांची रक्कम ठरविण्याबाबत परीक्षा मंडळाने केलेली शिफारस विचारार्थ.**

(टिपणी: विद्यापीठातंर्गत काही महाविद्यालयामध्ये विद्यापीठ अनुदान आयोगामार्फत सुरु असणारे प्रमाणपत्र व पदविका कोर्स (करिअर ओरीएंटेड कोर्सेस) अशा महाविद्यालयामध्ये परीक्षा शुल्काबाबत संदिग्धता आहे. काही कोर्सेससाठी `१६५/- व काहीसाठी `६५/- फक्त अशी विविधता आहे. विद्यापीठात संलगित एकूण चार महाविद्यालयामध्ये चार प्रमाणपत्र व आठ पदविका परीक्षा घेण्यात येतात. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| CERTIFICATE LEVEL COURSES/PROGRAMMES | |
|---|---|
| 1. | Certificate Course in Soil and Water Analysis |
| 2. | Certificate Course in Travel & Tourism |
| 3. | Certificcate Course in Sericulture |
| 4. | Advanced Certificaate Course in Sugam Sangeet |
| **DIPLOMA LEVEL COURSES/PROGRAMMES** | |
| 1. | Diploma Course in Repair & Maintenance of Electronic Appliances |
| 2. | Diploma Course in Insurance |
| 3. | Diploma Course in Web Disigning & Office Automation[COP] |
| 4. | Diploma in Business Management [D.B.M] |
| 5. | Post Graduate Diploma in Computer Application [P.G.D.C.A] |
| 6. | Diploma Course in Indian Classical Music |
| **ADVANCED DIPLOMA LEVEL COURSES/PROGRAMMES** | |
| 7. | Advanced Diploma in Travel & Tourism |
| 8. | Advanced Diploma in Repair & Maintenance of Electronic Appliances |

उपरोक्त प्रमाणपत्र व पदविका कोर्सेस (करिअर ओरीएंटेड कोर्सेस) साठी परीक्षा शुल्क ठरविण्याबाबत विषय क्र.८ अन्वये दि. २/९/२०११ रोजी झालेल्या परीक्षा मंडळाच्या विचारार्थ ठेवला असता खालीलप्रमाणे ठराव झालेला आहे.

| | |
|---|---|
| **ठराव क्र. ८** | **विषयांत नमूद केलेल्या सर्व व्यवसायाभिमुख अभ्यासक्रमांची (करिअर ओरीएंटेड कोर्सेस) परीक्षा फॉर्म शुल्कांची रक्कम Certificate, Diploma व Advanced Diploma करिता `१६५/-इतकी आकारणी करण्यात यावी अशी शिफारस परीक्षा मंडळाच्या वतीने व्यवस्थापन परिषदेकडे करण्यात आली.** |

परीक्षा मंडळाची शिफारस विचारार्थ).

**ठराव : परीक्षा मंडळाने केलेली शिफारस दुरुस्तीसह स्विकारुन व्यवसायाभिमुख अभ्यासक्रमांची (करिअर ओरीएंटेड कोर्सेस) परीक्षा घेण्यासाठी विद्यापीठाकडे भरणा करावयाच्या शुल्कांची रक्कम `१६५/- ऐवजी `१००/- आकारण्यास मान्यता देण्यात आली.**

**[ ०७ ]** **सोलापूर विद्यापीठाचा सन २००९ -१० चा वार्षिक मराठी अहवाल विचारार्थ.**

(टिपणी - महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम २८(गग) नुसार, खालीलप्रमाणे तरतूद आहे.

**वार्षिक अहवाल, वार्षिक लेखे व लेखापरीक्षा अहवाल यांच्यावर विचार करणे व ते स्वीकारणे आणि ते अधिसभेकडे मान्यतेसाठी पाठवणे.**

सबब, सन २००९ -१० चा वार्षिक अहवाल तयार करण्यासाठी खालील समितीचे गठण केलेले होते.

| | |
|---|---|
| १) डॉ. लोणीकर एस. व्ही. | अध्यक्ष |
| २) डॉ. इंगोले कृष्णा | सदस्य |
| ३) डॉ. कदम एस. डी. | सदस्य |
| ४) डॉ. श्रीमती याजमान्य एस. आर. | सदस्य |
| ५) डॉ. श्रीमती ॲनी जॉन | सदस्य |
| ६) श्रीमती चोपडे ए. बी., सहा. कुलसचिव | सदस्य सचिव |

उक्त समितीने महाविद्यालये, विद्यापीठ संकुले व प्रशासनाकडून मागवून घेतलेल्या माहीतीवर एकत्रित विचार करुन, वेळोवेळी बैठका घेऊन, सदरचा मराठी अहवाल तयार करुन, व्यवस्थापन परिषदेकडे मान्यता देणेबाबतच्या कार्यवाहीसाठी शिफारस केलेली आहे. व्यवस्थापन परिषद च्या शिफारशी नंतर सदरच्या अहवालास अधिसभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम १०४(१) व १०४(२) ची तरतूद खालीलप्रमाणे -

**Section 104 (1) :**

The Annual Report of the university shall be prepared and published by the university and such report as approved by the Management Council shall be submitted to the Chancellor, State Government and Senate. The Senate may consider the annual report in its meeting and may make recommendations as it deems fit. The Management Council shall take appropriate action on the recommendations of the Senate and report the action taken to the Senate.

**Section 104 (2) :**

namely - (z) The State Government shall cause the annual report of the university, received by it, to be laid before each House of the State Legislature.

सबब, सन २००९ -१० साठीचा वरील समितीने तयार केलेला वार्षिक अहवाल विचारार्थ).

**ठराव :** **सोलापूर विद्यापीठाचा सन २००९-१० चा वार्षिक मराठी अहवाल स्विकारुन अधिसभेस शिफारस करण्यात आला.**

**[ ०८ ] शैक्षणिक वर्ष २०१०-११ पासून पूर्वी वर्षनिहाय असलेल्या सर्व परीक्षा सत्र पध्दतीने सुरु झालेल्या आहेत. त्याप्रमाणे सत्र परीक्षेच्या लेखी परीक्षेचे मुल्यमापनाच्या मानधनामध्ये वाढ करण्यात आलेली असून वर्षनिहाय परीक्षा मुल्यमापनाच्या मानधनामध्ये वाढ करण्याबाबत परीक्षा मंडळाने केलेली शिफारस विचारार्थ.**

(टिपणी: पूर्वी वर्षनिहाय सुरु असलेल्या सर्व परीक्षा, शैक्षणिक वर्ष २०१०-११ पासून सत्र पध्दतीने सुरु झालेल्या आहेत. त्याप्रमाणेच सत्र परीक्षेच्या लेखी परीक्षेचे मुल्यमापनाच्या मानधनामध्ये यापूर्वी वाढ करण्यात आली आहे. तथापि पूर्वी वर्षनिहाय होत असलेल्या परीक्षेच्या मुल्यमापनाच्या मानधनामध्ये वाढ करण्यात आली नव्हती. याबाबत संबंधित प्राध्यापकांकडून विद्यापीठाकडे वारंवार मानधन वाढीबाबत विचारणा करण्यात येत आहे. सदर बाब विचारात घेता याप्रकरणी धोरणात्मक निर्णय घेण्याची बाब आयत्या वेळेचे विषय क्र.२७ (४) अन्वये दि.२/९/२०११ रोजी झालेल्या परीक्षा मंडळाच्या विचारार्थ ठेवली असता खालीलप्रमाणे ठराव झालेला आहे.

| | |
|---|---|
| ठराव क्र. २७ (४) | शैक्षणिक वर्ष २०११-१२ पासून पूर्वी वर्षनिहाय असलेल्या १०० गुणाच्या कला, वाणिज्य व विज्ञान विद्याशाखांच्या पदवी परीक्षेच्या उत्तरपत्रिकेच्या मुल्यमापनामध्ये ₹६/- वरुन ₹९/- प्रति उत्तरपत्रिका याप्रमाणे वाढ करण्याची शिफारस परीक्षा मंडळ व्यवस्थापन परिषदेस करीत आहे. |

सबब, परीक्षा मंडळाची शिफारस विचारार्थ).

ठराव : **परीक्षा मंडळाने केलेली शिफारस दुरुस्तीसह स्विकारुन शैक्षणिक वर्ष २०११-१२ पासून कला, वाणिज्य व विज्ञान विद्याशाखेच्या पदवी व पदव्युत्तर परीक्षेच्या १०० गुणांच्या उत्तरपत्रिकेच्या मूल्यमापनाचे मानधन ₹६/- वरुन ₹१०/- प्रति उत्तरपत्रिका अशी वाढ करण्यास मान्यता देण्यात आली.**

**[ ०९ ] विद्यापीठामार्फत विविध विद्याशाखांतर्गत विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या TRANSCRIPTS च्या शुल्कात इतर विद्यापीठातील प्रचलित शुल्काप्रमाणे वाढ करण्याबाबत परीक्षा मंडळाने केलेली शिफारस विचारार्थ.**

(टिपणी: महाराष्ट्रातील अन्य विद्यापीठापेक्षा या विद्यापीठाकडून आकारणी करण्यात येणारे TRANSCRIPTS च्या शुल्कांची रक्कम कमी आहे. त्यामुळे TRANSCRIPTS शुल्कात वाढ करण्याची बाब विषय क्र.१३ अन्वये दि. २/९/२०११ रोजी झालेल्या परीक्षा मंडळाच्या विचारार्थ ठेवली असता खालीलप्रमाणे ठराव झालेला आहे.

ठराव क्र. १३ महाराष्ट्रातील अन्य विद्यापीठापेक्षा प्रस्तुत विद्यापीठाकडून आकारणी करण्यात येणारे TRANSCRIPTS च्या शुल्काची रक्कम कमी आहे. त्यामुळे सदर बाब विचारात घेता TRANSCRIPTS च्या शुल्कात खालीलप्रमाणे वाढ करण्याची शिफारस परीक्षा मंडळ व्यवस्थापन परिषदेस करित आहे.

| अ.क्र. | तपशिल | आत्ताचे दर | वाढ करण्यासाठी शिफारस केलेले दर |
|---|---|---|---|
| १ | प्रत्येक परीक्षा प्रत्येक गुणपत्रिका | ₹५०/- | ₹१००/- |
| २ | डाक खर्च | ₹१००/- | ₹१००/- (डाक खर्च पूर्वीप्रमाणेच) |

वरीलप्रमाणे परीक्षा मंडळाची शिफारस विचारार्थ).

**ठराव : परीक्षा मंडळाने केलेली शिफारस स्विकारुन मान्यता देण्यात आली.**

**[ १० ] प्रा. एस.के. मठपती सहाय्यक प्राध्यापक (कंत्राटी) वाणिज्य व व्यवस्थापन संकुल यांनी महिना एकत्रित वेतन वाढवून मिळण्याबाबतची दि.१६/०८/२०११ रोजीच्या पत्रान्वये केलेली विनंती विचारार्थ.**

(टिपणीः प्रा. एस.के. मठपती यांची रितसर मुलाखत घेवून तात्पुरत्या स्वरुपात एकत्रित वेतन ₹१२,०००/- (रुपये बारा हजार) सहाय्यक प्राध्यापक या पदावर वाणिज्य व व्यवस्थापन संकुल येथे दि.१०/०८/२०११ पासून सेवेत रुजू झाले आहेत. त्यांनी हजर दिनांकापासून प्रति महिना एकत्रित वेतन ₹१२,०००/- ऐवजी ते वाढवून माहे ₹२५,०००/- द्यावे अशी विनंती दि.१६/०८/२०११ रोजीच्या पत्रान्वये केली आहे.

विद्यापीठात UGC नियमाप्रमाणे पात्र कंत्राटी शिक्षकाना व Professional Cources च्या कंत्राटी शिक्षकांना खालीलप्रमाणे वेतन अदा केले जाते.

सहाय्यक प्राध्यापक - ₹१२,०००/-
सहयोगी प्राध्यापक - ₹१६,०००/-
प्राध्यापक - ₹३०,०००/-

सबब प्रा. एस.के.मठपती, सहाय्यक प्राध्यापक (कंत्राटी) यांना एकत्रित वेतन वाढवून देण्याबाबतचे त्यांचे दि.१६/०८/२०११ रोजीचे पत्र विचारार्थ).

ठराव : **१) प्रा. एस. के. मठपती, सहा. प्राध्यापक (कंत्राटी) यांच्या पूर्वीच्या सेवेचा तपशील विचारात घेता त्यांच्या पदाचे नामाभिदान सहयोगी प्राध्यापक (कंत्राटी) करण्याची कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात आली.**

**२) प्रा. एस.के. मठपती यांना दि.१६/०८/२०११ पासून त्यांचा अनुभव व पूर्वीच्या सेवेतील वेतन निश्चिती लक्षात घेता खास बाब म्हणून दरमहा ₹२०,०००/- असे वेतन अदा करण्यास मान्यता देण्यात आली.**

**[ ११ ] M.S.W. Part- I & II या सत्र पध्दती अभ्यासक्रसाठीचा अध्यादेश क्र. २५ मध्ये सुधारणा (Amendment) केल्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव.**

(टिपणी: शै. वर्ष २०१०-११ पासून M.S.W. या अभ्यासक्रमासाठी सत्र पध्दतीचा अवलंब करण्यात आलेला आहे. त्यानुषंगाने, सदर कोर्सचा अध्यादेश क्र.२५ मा.कुलपती कार्यालयाकडे दि.९/९/२०१० रोजी पाठविण्यात आलेला आहे.

दि. ४/८/२०११ रोजीच्या समाजकार्य अस्थाई अभ्यासमंडळाच्या बैठकीत आयत्या वेळचा ठराव क्र.५ नुसार अध्यादेश क्र.२५ मध्ये सुधारणा करुन, विद्याशाखेकडे शिफारस केलेली आहे. तसेच मा.अधिष्ठाता, समाजिकशास्त्रे विद्याशाखा यांनी सुधारीत केलेल्या अध्यादेशाची शिफरस विद्यापरिषदेकडे केलेली आहे.

**Amended ordinance No. 25**

**Standard of Passing:** For passing examination the candidate must get 40% marks in each subject per semester.

The candidate securing 40% or more of aggregate marks in the examination shall be declared to have passed the examination in Pass Class. The candidate securing 45% or more of aggregate marks in the examination shall be declared to have passed the examination in Second Class. The candidate securing 55% or more of aggregate marks in the examination shall be declared to have passed the examination in Higher Second Class. The candidate securing 60% or more of aggregate marks in the examination shall be declared to have passed the examination in First Class. The candidate securing 70% or more of aggregate marks in the examination shall be declared to have passed the examination in First Class.with Distinction.

उक्तप्रमाणे, मा. अधिष्ठाता यांची शिफारस अवलोकनी घेऊन, महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील कलम ५४(१) नुसार, M.S.W. या अभ्यासक्रमासाठीचा अध्यादेश क्र.२५ सुधारणा केल्याच्या बाबीस मा.कुलगुरुमहोदयांनी महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील कलम १४(७) अन्वये, विद्यापरिषद व व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मान्यता दिलेली आहे.

सबब, सामाजिकशास्त्रे विद्याशाखांतर्गत M.S.W. या सत्र पध्दती अभ्यासक्रमाचा अध्यादेश क्र.25 (Standard of Passing) मध्ये सुधारणा केल्याच्या बाबीस मा.कुलगुरुमहोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेली कार्यवाही माहितीस्तव)

**ठराव : मा.कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.**

**[ १२ ] विद्यापीठाच्या ऑक्टोबर/नोव्हेंबर २०११ मध्ये सुरु होणा-या नविन सत्रनिहाय एम.फार्मसी (सत्र-III व IV), एम.एस्सी(गणित) व एम.एस्सी (संगणक शास्त्र) या विद्याशाखांच्या परीक्षा शुल्क ठरविण्याबाबत महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील कलम १४(७) अन्वये मा.कुलगुरुमहोदयांनी केलेली कार्यवाही माहितीस्तव.**

(टिपणी: विद्यापीठाच्या ऑक्टोबर/ नोव्हेंबर २०११ मध्ये सुरु होणाऱ्या नविन सत्रनिहाय एम.फार्मसी (सत्र-III व IV), एम.एस्सी (गणित) व एम.एस्सी (संगणक शास्त्र) या विद्याशाखांच्या परीक्षेच्या शुल्कात खाली नमूद केल्याप्रमाणे मा.कुलगुरुमहोदयांनी महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम ३२ (४) अन्वये परीक्षा मंडळाच्या वतीने मान्यता दिली होती.

| अ.क्र. | विद्याशाखा | मान्य करण्यात आलेल्या शुल्काची रक्कम | |
|---|---|---|---|
| १) | एम.फार्मसी (सत्र-III) | ₹२,५००/- | |
| २) | एम.फार्मसी (सत्र- IV) | ₹२,५००/- | |
| ३) | एम.एस्सी (गणित) | लेखी परीक्षा | ₹५२५/- |
| | | प्रात्यक्षिक परीक्षा | ₹ ८०/- |
| | | **एकूण** | **₹६०५/-** |
| ४) | एम.एस्सी(संगणक शास्त्र) | ५०% विषय मागील परीक्षेचे उत्तीर्ण असल्यास त्याची ५०% परीक्षा शुल्क आकारणी. | |

वरीलप्रमाणे दिलेली मान्यता दि.२/९/२०११ रोजी झालेल्या परीक्षा मंडळाच्या सभेमध्ये विषय क्र.२३ अन्वये सादर केली असता खालीलप्रमाणे ठराव झालेला आहे.

| | |
|---|---|
| ठराव क्र. २३ | महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ मधील कलम ३२ (४) अन्वये मा.कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेऊन सदरची मान्य करण्यात आलेली शुल्काच्या रक्कमेस मान्यता मिळणेबाबत परीक्षा मंडळ व्यवस्थापन परिषदेस शिफारस करीत आहे. |

ऑक्टोबर/नोव्हेंबर २०११ मध्ये होणाऱ्या परीक्षेचा अल्प अवधी विचारात घेऊन परीक्षेची आवेदनपत्रे सुधारित शुल्कासह स्विकारण्याची प्रक्रिया त्वरीत सुरु करणे आवश्यक होते. परंतु नजीकच्या काळात व्यवस्थापन परिषदेची सभा होणार नसल्याने व सदरची प्रक्रिया तातडीने सुरु करणे आवश्यक असल्याने व्यवस्थापन परिषदेच्या वतीने महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील कलम १४(७) अन्वये मा.कुलगुरुमहोदयांनी केलेली कार्यवाही माहितीस्तव).

**ठराव : मा.कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.**

**[ १३ ]  वर्ग ०१ व ०२ च्या शिक्षकेतर पदांसाठी सरळसेवेने नियुक्ती करावयाच्या जाहिरातीस, पात्रता व इतर अटी, शर्तीबाबत मा.कुलगुरुमहोदयांनी केलेली कार्यवाही माहितीस्तव.**

(टिपणी: विद्यापीठास महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे शासन निर्णय क्र. एसयुएस/२००९/(३९२०/०९) विशि-१ दि. १९/०९/२००९ नुसार २१० पदास पदनिहाय मंजुरी मिळालेली आहे. त्यानुसार विद्यापीठातील सरळसेवेसाठी रिक्त असलेल्या वर्ग ०१ व ०२ च्या १६ पदासाठीच्या जाहिरातीस, पात्रता व इतर अटी, शर्तीस महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील कलम १४(७) अन्वये, मा.कुलगुरुमहोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मान्यता दिलेली आहे. सदरची बाब व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव).

**ठराव :  मा.कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.**

**[ १४ ]** **वर्ग ०१ व ०२ च्या शिक्षकेतर पदांसाठी सरळसेवेने नियुक्ती करावयाच्या जाहिराती-नुसार घेण्यात येणाऱ्या लेखी परीक्षेसाठी १०० गुण व मुलाखतीसाठी ५० गुण ठरविण्याबाबत मा.कुलगुरुमहोदयांनी केलेली कार्यवाही माहितीस्तव.**

(टिपणी: विद्यापीठातील वर्ग ०१ व ०२ संवर्गातील रिक्त नियमित प्रशासकीय (शिक्षकेत्तर) पदे सरळसेवेने भरण्यासाठी विद्यापीठ जाहिरात क्र. सोविसो/आस्था /३४/२०१०, दि.०९-०७-२०१० नुसार विद्यापीठ, महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर व वर्तमानपत्रात जाहिरात देऊन दि.१३-०८-२०१० पर्यंत अर्ज मागविण्यात आले होते. त्यानुसार लेखी परीक्षेस पात्र झालेल्या उमेदवारांची लेखी परीक्षा दि.१८-०९-२०१० व १९-०९-२०१० रोजी घेण्यात आली.

वर्ग १ व २ च्या लेखीपरीक्षेस व तोंडी मुलाखत किती गुणाची असावी याबाबत महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८१ मध्ये उल्लेख नाही.

तथापि महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम २८ (न) नुसार उमेदवारांना १०० गुणांच्या पेपरला ३५ गुणांना मुलाखतीसाठी पात्र ठरविण्यास व मुलाखतीस ५० गुण ठेवण्यास महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम १४ (७) नुसार मा.कुलगुरुमहोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मान्यता दिलेली आहे. सदरची बाब माहितीस्तव).

**ठराव :** **मा.कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.**

**[ १५ ] विद्यापीठ व संलग्न महाविद्यालयातील विद्यार्थी परिषद स्थापन करण्याच्या तारखेबाबत मा.कुलगुरुंनी केलेली कार्यवाही माहितीस्तव.**

(टिपणी: उच्च व तंत्र शिक्षण विभागा यांचे पत्र युएसजी-२००७/(प्र.क्र.२०७)/विशि-१, दि.२३/०८/२०११ रोजीच्या पत्रान्वये व मा. सर्वोच्च न्यायालयाच्या याचिका क्र. ८८७/०९ व विद्यापीठ व संलग्न महाविद्यालयातील विद्यार्थी परिषदाच्या निवडणूकीबाबत विद्यापीठ व महाविद्यालय स्तरावर कोणतीही कार्यवाही करु नये असे कळविण्यात आलेले होते.

परंतू दि.२३/०८/२०११ रोजीच्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे पत्र क्र. युएसजी-२००७/(प्र.क्र.२०७)/विशि-४, दि.२३/०८/२०११ रोजीच्या पत्रानुसार वरील पत्र क्र. युएसजी-२००७/(प्र.क्र.२०७)/विशि-४, दि.०१/०२/२०११ हे रद्दबातल समजण्यात यावे असे कळविण्यात आलेले आहे (सोबत दोन्ही पत्रांच्या प्रती जोडलेल्या आहेत).

विद्यार्थी परिषद स्थापन करण्यासाठी तारीख निश्चित करण्याबाबत विद्यापीठ अधिनियम क्रमांक S.446 खालीलप्रमाणे आहे (The Principal shall finalise the nomination of the student members and other namely, one lecturer on the basis of his/her interest and experience in the students welfare activities, one Sr. Division NCC Officer, one NSS Programme Officer, and the Director of Sports and Physical Education, if any, on the Students' Council as per the provision in Section 40 (2) (b) and declare the Students' Council, duly formed on a date fixed by the Management Council)

सदरची तारीख महाविद्यालयांना त्वरीत कळविणे आवश्यक असल्याने महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ च्या कलम १४ (७) नुसार मा.कुलगुरुमहोदय यांनी दि.२७/०९/२०११ या तारखेस विद्यार्थी मंडळ स्थापनेची घोषणा करण्यासाठी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मान्यता दिलेली आहे. मा.कुलगुरुंनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेली कार्यवाही माहितीस्तव).

**ठराव : मा.कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.**

**[ १६ ] सन २०११-१२ या आर्थिक वर्षाकरिता विद्यापीठातील सर्व संकूलातील पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या दैनंदिन प्रात्यक्षिकेसाठी आवश्यक असणारी Aldrich Chemical खरेदीच्या वार्षिक दरकराराबाबत.**

(टिपणी: सन २०११-१२ या आर्थिक वर्षाकरिता विद्यापीठातील सर्व संकूलातील पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या दैनंदिन प्रात्यक्षिकेसाठी आवश्यक असणारी रसायने व काचेची उपकरणे खरेदीसाठी तीन फर्मशी एक वर्षाच्या कालावधीकरिता दरकरार करण्यास दि. २१/०७/२०११ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेने ठराव क्र. २६ अन्वये मान्यता दिलेली आहे.

M/s. Yash Traders, Solapur यांचेशी Aldrich Chemical साठी दर करार करण्यात आला होता. तथापी M/s. Yash Traders, Solapur यांनी दि.०१/०८/२०११ रोजीच्या पत्रान्वये Aldrich Chemical चा पुरवठा करण्यास असमर्थता दर्शविलेली आहे, तसे लेखी कळविले आहे.

M/s Shree Sai Chemical, Solapur यांनी वाटाघाटीच्या वेळी Aldrich Chemical - CD Price वर पुरवठा करण्यास तयार असल्याबाबत तयारी दर्शविलेली होती. M/s. Shree Sai Chemical, Solapur यांनी यापुर्वी Aldrich Chemical- CD Price वर पुरवठा केलेला आहे.

रसायनशास्त्र संकूलास एम.एस्सी. च्या दैनंदिन प्रात्यक्षिकेसाठी व संशोधनाकरिता Aldrich Chemical ची आवश्यकता असल्याने M/s. Shree Sai Chemical, Solapur यांचेकडून Aldrich Chemical-CD Price वर खरेदी करण्यास मा. कुलगुरूंनी मान्यता दिलेली आहे. सदरची बाब व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव).

**ठराव : मा.कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.**

**[ १७ ] रसायनशास्त्र संकुलाकडील सहाय्यक प्राध्यापक (कंत्राटी) यांनी वेतन वाढीबाबत केलेली मागणी विचारार्थ.**

( टिपणी : विद्यापीठाच्या UGC नियमाप्रमाणे पात्र असलेल्या विविध संकुलाकडील Non Profenional Cources चे सहाय्यक प्राध्यापक (कंत्राटी) व Professional Cources च्या सहाय्यक प्राध्यापक (कंत्राटी) यांना खालीलप्रमाणे वेतन आदा केले जाते.

| अ. क्र | संकुलाचे/ विभागाचे नांव | शैक्षणिक अर्हता | प्रति तास रु.३००/- प्रमाणे आदा करण्यात येणारे वेतन | विद्यापीठ फंडातून अदा करण्यात येणारे वेतन | एकूण/ एकत्रित वेतन |
|---|---|---|---|---|---|
| १ | पदार्थविज्ञान संकुल | एम.एस्सी | ८,४००/- | १,६००/- | १०,०००/- |
| | | एम.एस्सी (सेट) | ८,४००/- | ३,६००/- | १२,०००/- |
| २ | भूशास्त्र संकुल | एम.एस्सी<br>एम.एस्सी (सेट) | ८,४००/-<br>८,४००/- | --<br>३,६००/- | ८,४००/-<br>१२,०००/- |
| ३ | संगणकशास्त्र संकुल | एम.सी.ए | ८,४००/- | ३,६००/- | १२०००/- |
| | | एम.एस्सी (Comp.Sci) | ८,४००/- | -- | ८,४००/- |
| ४ | सामाजिकशास्त्रे संकुल | एम.ए | -- | -- | ८,४००/- |
| | | एम.जे.सी,सेट/नेट | -- | -- | १२,०००/- |
| ५ | शिक्षणशास्त्र विभाग | एम.एड (सेट/नेट) | -- | -- | १२,०००/- |
| ६ | वाणिज्य व व्यवस्थापन | एम.बी.ए | -- | -- | १२,०००/- |
| ७ | रसायनशास्त्र संकुल | एम.एस्सी | -- | -- | ६,०००/- |
| | | एम.एस्सी (सेट) | -- | -- | १२,०००/- |

तथापी, रसायनशास्त्र संकुलाकडील सहाय्यक प्राध्यापक (कंत्राटी) यांनी वेतन वाढवून मिळावे अशी विनंती केली आहे. त्यानुसार, संचालक रसायनशास्त्र संकुल यांनी SET/NET नसणा-या सहाय्यक प्राध्यापक (कंत्राटी) यांना ₹१०,०००/- पर्यंत दरमहा वेतन वाढवून मिळावे अशी शिफारस केली आहे.

सबब सदरची शिफारस विचारार्थ )

**ठराव : रसायनशास्त्र संकुलाकडील सेट/नेट अर्हता धारण करीत नसलेल्या सहाय्यक प्राध्यापक (कंत्राटी) यांचे वेतन ₹६,०००/- वरुन ₹८,४००/- इतके ऑक्टोबर २०११ या महिन्यापासून वाढविण्यास मान्यता देण्यात आली.**

**[ १८ ] विद्यापीठाकडील M.B.A व M.Com या अभ्यासक्रमाचा वाणिज्य व व्यवस्थापन संकुल (स्कूल ऑफ कॉमर्स ॲन्ड मॅनेजमेंट) या अतंर्गत समावेश करुन तसे नामाभिदान करण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी : विद्यापीठामध्ये मास्टर इन बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन (M.B.A) हा अभ्यासक्रम सुरु करणेस दि. १०/०३/२०१० रोजीच्या व्यवस्थापन परिषदेमध्ये ठराव क्र. १८ (९) अन्वये मान्यता देण्यात आली आहे. तसेच मास्टर ऑफ कॉमर्स (M.Com) हा दोन वर्षाचा अभ्यासक्रम सुरु करणेस दि. १७/०३/२०११ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेमध्ये ठराव क्र. १३ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

तरी सदरच्या अभ्यासक्रमांचे वाणिज्य व व्यवस्थापन संकुल (स्कुल ऑफ कॉमर्स ॲन्ड मॅनेजमेंट) या संकुलातंर्गत समावेश करुन त्याप्रमाणे नामाभिदान करण्याची बाब विचारार्थ).

**ठराव : विद्यापीठाकडील M.B.A व M.Com या अभ्यासक्रमाचा वाणिज्य व व्यवस्थापन संकुल (स्कूल ऑफ कॉमर्स ॲन्ड मॅनेजमेंट) या अतंर्गत समावेश करुन वाणिज्य व व्यवस्थापन संकुल असे नामाभिदान करण्यास मान्यता देण्यात आली.**

**[ १९ ] विद्यापीठाकडील M.Ed व M.A (Education) हे अभ्यासक्रम शिक्षणशास्त्र संकुल (स्कूल ऑफ एज्युकेशन) या अंतर्गत समावेश करुन शिक्षणशास्त्र संकुल असे नामाभिदान करण्याची बाब विचारार्थ )**

(टिपणी : विद्यापीठामध्ये M. Ed हा अभ्यासक्रम २००६-२००७ या शैक्षणिक वर्षापासून राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषद (NCTE) यांच्या पत्र क्र. No.WRC/५-६/२००६/C-११९७३ दि.२७ सप्टेबर, २००६ (०५/०३/२००७) अन्वये सुरु करण्यात आला आहे. तसेच M.A (Education) हा अभ्यासक्रम सुरु करण्यास दि. २७/१२/२००७ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेमधील ठराव क्र. ०७ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. सदरचे दोन्हीही अभ्यासक्रम हे शिक्षणशास्त्र अधिविभागाअंतर्गत सुरु आहेत.

तरी सदरच्या अभ्यासक्रमांचे शिक्षणशास्त्र संकुल (स्कूल ऑफ एज्युकेशन) या संकुलातंर्गत समावेश करुन त्याप्रमाणे नामाभिदान करण्याची बाब विचारार्थ).

**ठराव : विद्यापीठाकडील M.Ed व M.A (Education) हे अभ्यासक्रम शिक्षणशास्त्र संकुल (स्कूल ऑफ एज्युकेशन) या अंतर्गत समावेश करुन शिक्षणशास्त्र संकुल असे नामाभिदान करण्यास मान्यता देण्यात आली.**

## मा. कुलगुरु यांच्या परवानगीने येणारे आयत्या वेळेचा विषय

**[२०(१)] दि.२९/०९/२०११ रोजीच्या तक्रार निवारण समितीने केलेल्या शिफारशी विचारार्थ.**

(टिपणी : तक्रार निवारण समितीकडे प्राप्त झालेल्या प्रा.डॉ.जे.बी.दफेदार यांच्या तक्रारी अर्जावर दिलेल्या निर्णयासंदर्भात मा.उच्च न्यायालय याचिका क्रं ९९८८/२०१० दि.२७/०७/२०११ रोजीच्या आदेशानुसार मुद्दा क्रं ९ अन्वये दि. १६/०८/२०१० रोजीच्या सुनावणी बैठकीत ठरल्याप्रमाणे दि.३०/८/२०११ रोजी दोन्ही पक्षकारांनी आपापले तोंडी म्हणणे सादर केले. तद्नंतर दि.२६/०९/२०११ रोजीच्या तक्रार निवारण समितीच्या बैठकीत पुन:श्च म्हणणे ऐकून घेऊन सदरील बैठकीत ठरल्याप्रमाणे दि.२९/०९/२०११ रोजीच्या तक्रार निवारण समिती बैठकीतील ठराव क्रं ०२ नुसारच्या शिफारशी सोबत जोडल्या आहेत.

सदरच्या शिफारशीना परिनियम ३३५ अन्वये व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेणे आवश्यक आहे. सोबत जोडल्या प्रमाणे तक्रार निवारण समितीच्या शिफारशी व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

**ठराव : दि.२९/०९/२०११ रोजीच्या तक्रार निवारण समितीने केलेल्या शिफारशी परिनियम ३३५ अन्वये स्विकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.**

**[२०(२)] संलग्नित महाविद्यालयांत सुरु असलेल्या अभ्यासक्रमासाठी महाविद्यालयाकडून आकारल्या जाणाऱ्या शुल्क तपासणीकामी समिती गठीत करण्याची बाब विचारार्थ..**

(टिपणी : संलग्नित महाविद्यालयांमध्ये सुरु असलेल्या अभ्यासक्रमांसाठी महाविद्यालयाने प्रवेशित विद्यार्थ्यांकडून विद्यापीठाने / शिक्षण शुल्क समितीने निर्धारीत केलेल्या शुल्काप्रमाणेच शुल्क आकारणे अनिवार्य आहे.

तथापि संलग्नित महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांकडून व इतर सामाजिक संस्थाकडून / संघटनेकडून विद्यापीठाकडे काही महाविद्यालये अभ्यासक्रमासाठी निर्धारीत केलेल्या शुल्का व्यतिरिक्त इतर शुल्क आकारले जात असल्याच्या तक्रारी विद्यापीठाकडे प्राप्त होत आहेत.

उपरोक्त बाब विचारार्थ घेता सर्व संलग्नित महाविद्यालयात भेट देवून महाविद्यालय विद्यार्थ्यांकडून नियमानुसार शुल्क आकारत आहे किंवा कसे याबाबत अहवाल प्राप्त करण्यास्तव समित्या गठीत करणे आवश्यक वाटते.

**सबब संलग्नित महाविद्यालयांत सुरु असलेल्या अभ्यासक्रमासाठी महाविद्यालयाकडून आकारल्या जाणाऱ्या शुल्क तपासणीकामी समित्या गठीत करण्याची बाब विचारार्थ).**

**ठराव : समित्या गठीत करण्याबाबत मा.कुलगुरुंना अधिकार देण्यात आले.**

मा.कुलगुरु यांच्या परवानगीने सभा संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले.

| | |
|---|---|
| **सही/-** | **सही/-** |
| **सचिव** | **अध्यक्ष** |
| **व्यवस्थापन परिषद** | **व्यवस्थापन परिषद** |